**विशेष दिवाणी दावा क्र. ४५१/२०१२**
**नि.क्र. १२३/क** पुढे सुरु....

**<u>वादीतर्फे साक्षीदार तुकाराम पाटील यांचा शपथेवर सरतपास पुढे सुरु</u>**

**<u>वकील श्रीमती पाटील यांच्यामार्फत</u>**

(०१) मला आता विनामोबदला बक्षिसपत्र दाखविण्यात येत आहे. सदर बक्षिसपत्र दिनांक १६/०४/१९८७ रोजीचे आहे. हे बक्षिसपत्र बल्लार वासुदेव जोशी, चिंतामण परशुराम जोशी त्यांच्या कुटुंबाने करुन दिलेले आहे. सदर बक्षिसपत्र हे मोहळ गावच्या गुरे चरण्यासाठी दिलेले आहे. सदर बक्षिसपत्र गावातील २३ पंचांना दिलेले आहे. त्यामध्ये माझे वडीलांचे नाव आहे. त्यावर माझे वडीलांची सही आहे. माझे वडीलांचे नाव दत्तात्रय बाळू पाटील आहे. मी माझे वडीलांची सही ओळखतो. त्यावर बक्षिसपत्र लिहून देणार यांची सही आहे. साक्षीदार जी.आर. पाटील व भक्तीकुमार दवे म्हणून होते व त्यांच्या सहया आहेत. बक्षिसपत्राची माहिती आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी १२८</u>** देण्यात येते.

(०२) मला आता दिनांक १८/०८/२००७ रोजीची ‘रायगड टाईम्स’ या वृत्तपत्रातील पेपर नोटीस दाखविली. ॲड. संतोष म्हात्रे यांचेमार्फत सदर नोटीस देण्यात आली होती. जमीनीचा व्यवहार करु नये म्हणून नोटीस दिली होती. त्यातील माहिती मी माझे वकिलांना दिली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.१२९</u>** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

| | |
|---|---|
| माझेसमक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| NINAD SHAM KAKADE Digitally signed by NINAD SHAM KAKADE Date: 2024.10.03 16:40:47 +0530 | NINAD SHAM KAKADE Digitally signed by NINAD SHAM KAKADE Date: 2024.10.03 16:40:53 +0530 |
| ( एन.एस. काकडे ) | ( एन.एस. काकडे ) |
| ३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल | ३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल |
| दिनांक ०३/१०/२०२४ | दिनांक ०३/१०/२०२४ |